# Expression of Interest
# (स्वारस्याची अभिरुची)
# मुदतवाढ-01

**विषय :- सुरजकुंड येथील आंतरराष्ट्रीय मेळाव्यामध्ये महाराष्ट्रातील खाद्य संस्कृति व विशेषत: राज्याच्या विविध भागांतील ग्रामीण खाद्यपदार्थांचे समावेश असलेली कॅटरिंग व्यवस्था करणेकरीता कॅटरर्सची नियुक्ती करणे.**

सुरजकुंड येथे दि.01/02/2019 ते 17/02/2019 रोजी आंतरराष्ट्रीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्यामध्ये महाराष्ट्र राज्याची Theme State म्हणून निवड करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने या मेळाव्यामध्ये महाराष्ट्रातील खाद्य संस्कृति व विशेषत: राज्याच्या विविध भागांतील ग्रामीण खाद्यपदार्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी / ओळख मिळवून देण्याकरिता महाराष्ट्रातील खाद्य संस्कृति व विशेषत: राज्याच्या विविध भागांतील ग्रामीण खाद्यपदार्थांचे समावेश असलेली कॅटरिंग व्यवस्था करणेकरीता कॅटरर्सची नियुक्ती करावयाची आहे.

**कामाचा वाव :-**

- सदर ठिकाणी प्रामुख्याने महाराष्ट्रातील खाद्य पदार्थ व विशेषत: राज्याच्या विविध भागांतील ग्रामीण खाद्यपदार्थांची व्यवस्था करणे.
- याकरिता आवश्यक Crockery / Cutlery व कुशल मनुष्यबळ या सर्व घटकांची व्यवस्था कॅटरर्सने स्वखर्चाने करावयाची आहे.
- सदर संस्थेला सुरजकुंड मेळा किंवा त्या प्रकारचा राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनामध्ये किमान दोन वेळा प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव तसेच केंद्र व राज्य शासन प्रायोजित कार्यक्रमांमध्ये केटरिंगचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**सादर करावयाची कागदपत्रे :-**

- शासकीय संस्था किंवा शासन मान्य बचत गटांसारख्या संस्था वगळून इतर कॅटरींग संस्था Food & Drug विभागामध्ये नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.

- ज्या संस्थेला काम मिळेल त्यांना हरियाणा राज्यातील सर्व नियमांचे पालन करावे लागेल. केटरिंग संस्थेची वार्षिक उलाढाल किमान रु.50.00 लक्ष असणे आवश्यक आहे. त्याकरिता सोबत गत 03 वर्षांच्या CA Certified, Income Tax Return files, इ. जोडणे आवश्यक आहे.

- निविदा धारकाकडे अशा प्रकारच्या कार्यक्रमांकरिता उपलब्ध असलेल्या साधन-सामुग्रींची यादी सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे पात्र कॅटरींग संस्थाना म.प.वि.महामंडळामार्फत स्टॉल उभे करण्यासाठी जागा देण्यात येईल. त्यानुसार इच्छूक संस्थांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह नोडल अधिकारी, सुरजकुंड तथा सह-व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेकडे सादर करावी.

- **निविदा सादर करण्याचा कालावधी -** दि.10/01/2019, सकाळी 10.00 वा. ते दि.12/01/2019 दु.3.00 वा. पर्यंत मर्यादित आहे.

- **मुदतवाढ** - दि.15/01/2019 ते 18/01/2019 दुपारी 03.00 वाजेपर्यंत

- **निविदा उघडण्याचा दिनांक -** दि.18/01/2019, दुपारी 03.00 वा. (शक्य असल्यास)

(प्राप्त निविदा कोणत्याही कारणाशिवाय रद्द करण्याचे सर्वस्व अधिकार म.प.वि.महामंडळाच्या प्रशासनाने राखीव ठेवलेले आहेत.)

**दिनांक – 15 जानेवारी, 2019**

**स्थळ - मुंबई.**